राज्यातील खाजगी अनुदानित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांना औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता -

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय, क्रमांक- पीसीआय-३०९४/[ ६३७७ ] तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक- २४ जून, १९९४.

पहा :- अखिल भारतीय, तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांची दिनांक-३१ मार्च, १९९४ ची पत्रे.

शासन निर्णय :- राज्यातील खाजगी संस्थांना अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय सुरु करण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच या खाजगी अनुदानित संस्थांना संस्थेमध्ये औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सुध्दा मंजूरी देण्यात आलेली आहे. तथापि, आता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक-३१ मार्च, १९९४ च्या निरनिराळ्या पत्रान्वये खाली निर्देशिलेल्या खाजगी अनुदानित संस्थांना त्यांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता दिलेली असल्याने या पूर्व मान्यतेस अनुसरुन शासनाकडून त्याप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे :-

| अ.क्र. संस्थेचे नांव | सुरु करण्याचा अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १] सी.यु.शहा कॉलेज ऑफ फार्मसी [एस.एन्.डी.टी. वुमेन्स विद्यापीठ]मुंबई | १] औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम | ३० |
| २] बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी, कालीना, मुंबई | १] औषध निर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम | ६० |
| ३] के.एम्.कुंदनानी कॉलेज ऑफ फार्मसी, वरळी, मुंबई. | १] औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम | ६० |
| ४] पूना कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे. | १] औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम. | ६० |
| ५] नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे फार्मसी कॉलेज, नाशिक | १] औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम | ६० |

Shri Khaluker

कृ. मा. प. २/-

२. वरील मान्यता ही अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या दिनांक-३१ मार्च, १९९४ च्या पत्रात दर्शविलेल्या अटी व शर्तींवर देण्यात येत आहे. तसेच या संस्थांबाबत/अभ्यासक्रमाबाबत शासनाकडून जे वेळोवेळी आदेश निर्गमित केलेले आहेत. त्या आदेशांच्या अटी व शर्तींवर देण्यात येत आहे. याबाबतची नोंद नोंदवहीत घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ सु. जे. सांगेकर ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई
उप संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई, पुणे, नाशिक
प्राचार्य, सी. यु. शहा कॉलेज ऑफ फार्मसी, मुंबई
प्राचार्य, बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी, कालिना, मुंबई
प्राचार्य, के. एम्. कुंदनानी कॉलेज ऑफ फार्मसी, मुंबई
प्राचार्य, पूना कॉलेज ऑफ फार्मसी, ~~मुंबई~~ पुणे.
प्राचार्य, नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे फार्मसी कॉलेज, नाशिक
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
कार्यासन अधिकारी, मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
प्रत माहितीसाठी -

१] अतिरिक्त सचिव [ तांत्रिक] भारत शासन, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद इंदिरा गांधी स्पोर्टस कॉम्प्लेक्स, आय.पी.इस्टेट, नवी दिल्ली-११०००२

२] सहाय्यक शिक्षण सल्लागार [तांत्रिक] भारत शासन मनुष्यबळ विकास मंत्रालय, [ शिक्षण विभाग ] पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल अश्युअरन्स बिल्डींग, चर्चगेट, मुंबई-२०

३] सचिव, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, १५, रामनाथ मार्ग, नवी दिल्ली-११००५४

महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२,
ई-मेल–desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/मान्यता/पीसीआय/२३-२४/ ८२६ दिनांक: 17 OCT 2023

कार्यालयीन आदेश :

विषय : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर नवीन संस्था सुरू करणे, विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढीसाठी मान्यतेबाबत......

संदर्भ :
१) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/तांशि-४, दि. ३१.०७.२०२३
२) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/ तांशि-४, दि. ०१.०८.२०२३
३) शासन निर्णय क्र. ई-६५१५३८-HTED-१४०२५/११/ २०२३-MHT-TE-५,दि.०१-०८-२०२३
४) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/ तांशि-४, दि. ०४.०८.२०२३
५) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/ तांशि-४, दि. ११.०८.२०२३
६) शासन निर्णय कर. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/ तांशि-४, दि. १८.०८.२०२३
७) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/ तांशि-४, दि. २३.०८.२०२३
८) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/ तांशि-४, दि. २५.०८.२०२३
९) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/ तांशि-४, दि. २८.०८.२०२३
१०) शासन निर्णय क्र. मान्यता -२०२३/प्र.क्र. ५७/(तांशि-४, दि. ०६.०९.२०२३

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भीन शासन निर्णयान्वये सोबतच्या **"विवरणपत्र अ"** मध्ये नवीन संस्था व **"विवरणपत्र ब"** मध्ये विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर विहित अटींच्या अधिन राहून सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार या संचालनालयाच्या अधिपत्याखालील येणा-या सोबतच्या **विवरणपत्र "अ" व "ब"** मधील संस्थांनी संदर्भीन शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेबाबतची कागदपत्रे या संचालनालयास उपलब्ध करुन दिली आहेत. संबंधित संस्थांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती यांचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये निर्धारीत संयुक्त खात्यात १० वर्ष मुदतीची मुदतठेव व निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क इ. बाबतची कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच संबंधित विद्यापीठ / महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता संलग्नता / तात्पुरती संलग्नता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भीन शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सोबतच्या **"विवरणपत्र अ"** मध्ये दर्शविलेल्या नवीन संस्थेतील अभ्यासक्रमांना व **"विवरणपत्र ब"** मध्ये दर्शविलेल्या विद्यमान संस्थेतील नवीन अभ्यासक्रमास व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमता वाढीसह या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर अनिवार्य बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करतील. तसेच संचालनालयाने निर्देशित केलेली माहिती संस्थांना संचालनालयामार्फत विकसीत केलेल्या प्रवेश क्षमता मान्यतेच्या पोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य राहील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली व या संचालनालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली, यांना राहतील.

५. शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये ज्या बाबींसाठी दुस-या वर्षासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव विहित केलेली आहे, अशा बाबींसाठी संबंधित संस्थांनी दुसरे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापुर्वी संस्थेचे अध्यक्ष / सचिव व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त नांवे १० वर्षासाठीची मुदतठेवीची पावती पडताळणीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

६. ज्या सस्थांच्या अभ्यासक्रमांना संबंधित विद्यापीठाने संलग्नता अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रदान केली असल्यास संलग्नतेच्या आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता संबंधित संस्थांना करणे बंधनकारक राहील. तसेच संबंधित संस्थांना विद्यापीठ / मंडळाच्या नियमांप्रमाणे नियमित संलग्नता घेणे बंधनकारक राहील.

७. सक्षम प्राधकि-याच्या मान्यतेचे आग प्रतिबंधक प्रमाणपत्र असणे व या प्रमाणपत्राचे वेळोवेळी नुतनीकरण करणे अनिवार्य राहील.

८. विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी / कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद / शासन / विद्यापीठ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व या व्यतिरीक्त वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे विवरणपत्र "अ" व "ब" मधील संस्थांना बंधनकारक राहील.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायर मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ / डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे / मुंबई विद्यापीठ, मुंबई / स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड / संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती / राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.
४. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे
५. संबंधित संस्था
६. कार्यासन क्र. ३ व १०, मुख्य कार्यालय, मुंबई.
७. निवड नस्तीस.

Prapatra B

Directorate of Technical Education, M.S. Mumbai - office order No. 2/NOC/MANYATA/PCI/23-24/926/ Dated - 17.10.23

List of Increase in intake / New courses , New Programe, Division Full and Intake Restoration in existing institute, Approved by PCI and Government of Maharashtra for A.Y. 2023-24

| SR. NO. | DTE CODE | PCI CODE | INSTITUTE NAME | Government Resolution No. and Date | LEVEL OF COURSE | MAIN COURSE NAME | COURSE NAME | UNIVERSITY NAME | APPROVED INTAKE A.Y. 2022-23 | INTAKE APPROVED A.Y.2023-24 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 4269 | PCI-113 | Anurag College Of Pharmacy , Warthi, Near Railway Station , Warthi, Dist.Bhandara - 441 905 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated- 23rd August, 2023 | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmaceutics | Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur UniversityNagpur | 0 | 6 |
| | | | | | | | Pharmaceutical Quality Assurance | | 0 | 6 |
| 10 | 5005 | PCI-1404 | MVP Samaj's College of Pharmacy, MVP Campus, Gangapur Road, Nashik - 422 002 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-31st July, 2023 | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmacology | Savitribai Phule Pune University, Pune | 4 | 9 |
| | | | | | | | Pharmacognosy | | 4 | 9 |
| | | | | | UNDER GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | | 60 (Aided) | 60 (Aided) 40 (Unaided) |
| 11 | 5197 | PCI-975 | Jagdamba Education Soceity,S.N.D. College of Pharmacy Babhulgaon, Tal. Yeola -423 401, Dist.Nashik. | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-31st July, 2023 | POST GRADUATE | Pharm D | Pharms D | Savitribai Phule Pune University, Pune | 0 | 30 |
| 12 | 5405 | PCI-1343 | Matoshri College of Pharmacy, Eklahare, Near Odhagaon, Aurangabad Highway, Tal. & Dist. Nashik - 422105 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-31st July, 2023 | POST GRADUATE | Pharm D | Pharms D | Savitribai Phule Pune University, Pune | 0 | 20 |
| 13 | 6503 | PCI-2058 | Shree Ambabai Talim Sanstha's Diploma In Pharmacy, Wanlesswadi, Miraj, Sangli | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated- 23rd August, 2023 | UNDER GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |
| 14 | 6509 | PCI-1792 | Walwa Taluka Education Societys S D Patil Institute of Pharmacy Urun Islampur, S D Patil Nagar, Urun Islampur Sangli, 415409 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated- 25th August, 2023 | UNDER GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 |
| 15 | 6516 | PCI-1146 | Krishna Charitable Trust's Krishna College of Pharmacy, Malkapur, Tal.Karad, Dist.Satara - 415539 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-31st July, 2023 | UNDER GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 60 | 100 |
| 16 | 6835 | PCI-663 | Gandhi Natha Rangji College of Pharmacy, 13, Budhwar Peth, Solapur-413 002 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated- 23rd August, 2023 | UNDER GRADUATE | Bachlor of Pharmacy | Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 60 | 100 |
| 17 | 6910 | PCI-1863 | Samarth Institute of Pharmacy, At Post - Belhe , Tal. Junnar, Dist-Pune - 412 410 | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated- 04th August, 2023 | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmaceutics | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 6 |
| | | | | | | | Pharmaceutical Chemistry | | 0 | 6 |
| 18 | 6942 | PCI-3545 | School of Pharmacy and Research Centre, Baramati. | G.R.No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated- 06th September, 2023. | UNDER GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 60 | 100 |

(Dr. Vinod Mohitkar)
Director,
Technical Education, M.S., Mumbai

DIRECTORATE OF TECHNICAL EDUCATION,
Maharashtra State,
3, Mahapalika Marg, P.B.No. 1967, BOMBAY - 400 001.

No.2 NGC/1086/ 2009

Bombay, 26 August, 1986.

26 AUG 1986

To:
The Principal,
NDMVP Samaj's College of Pharmacy,
NASIK.

Sub :- Permission to start M.Pharm. Course on No-Grant-Basis.

Sir,

With reference to the letter No.CA|1338, dated 12-8-1986, from the University of Poona, on the subject mentioned above, you are hereby permitted to start the M.Pharm.Course with total intake capacity of 20 students in -

1) Pharmaceutics, 2) Pharmaceutical Chemistry,
3) Pharmacology, 4) Pharmacognosy,
5) Medicinal Natural Products.

from the academic year 1986-87. The permission is provisional and valid upto 31st May, 1987 and subject to the fulfilment of following conditions : -

1) Laboratory should be strengthened by purchase of equipments for M.Pharm. to the tune of Rs.1.5 lacs in the year 1986-87.
2) Books worth Rs.40,000/- for M.Pharm. Course should be purchased during the year 1986-87. This includes the subscription for scientific journals also.
3) The proposed Research Laboratory should be equipped and furnished alongwith necessary gas and water connection.
4) The College should complete the construction work pertaining to Library and Laboratory by the end of September 1986 and Laboratory of the Industrial Pharmacy should be set up immediately thereafter.

You are requested to submit the compliance report to the undersigned, University and to the Chairman of the LIC at the earliest for verification of the compliance made by your College.

Yours faithfully,

B.B.Chopane
(B.B.CHOPANE)
I/c.Director of Technical Education,
M.S., Bombay.

cas/26-8.

College of Pharmacy, Nasik-2.
File No. 186-86-87
Inward No.
Date. 27/8/86

File D.T.E./55

University of Poona
Ganeshkhind,
Pune -411 007.

No. CA/

12th August, 1986

The Principal,
NDMVP Samaj's
College of Pharmacy
NASIK

Sub: Starting M.Pharm. Course from the academic year 1986-87

Sir,

With reference to your application No. CPN/65/86-87 dated 17-5-1986, seeking permission to start M.Pharm.Course in your college I am to inform you that permission is hereby granted to start the M.Pharm.Course with 20 intake capacity in: (1) Pharmaceutics, (2) Pharmaceutical Chemistry (3) Pharmacology (4) Pharmacognosy (5) Medicinal Natural Products from the academic year 1986-87 subject to the fulfilment of the following conditions laid down by the Local Inquiry Committee appointed for the inspection of your college.

(1) Laboratory should be strengthened by purchase of equipments for M.Pharm. to the tune of Rs. 1.5 lakh in the year 1986-87.

(2) Books worth Rs. 40,000/- for M.Pharm. Course should be purchased during the year 1986-87. This includes the subscription for scientific journals also.

(3) The proposed Research Laboratory should be equipped and furnished alongwith necessary gas and water connection.

(4) The college should complete the construction work pertaining to Library and Laboratory by the end of Sept. 1986 and Laboratory of the Industrial Pharmacy should be set up immediately thereafter.

You are requested to submit the compliance report to the University and to the Chairman of the LIC at the earliest for verification of the compliance made by your college.

Yours faithfully,

Registrar

Copy for information to:

1. Shri B.B. Chopane, Director of Technical Education, Mahapalika Marg, M.S. Bombay.
2. Dy. Registrar (Exam.) (3) Asstt. Registrar (S&T)
4. Asstt. Registrar (Co-ordi.) (5) Asstt. Registrar (Deve.)
6. Asstt. Registrar (R&M)

jvc.4837(86).

**फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राज्यातील कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र संस्था व अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास शासन मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र.मान्यता-२०२३/प्र.क्र.५७/तांशि-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३१ जुलै, २०२३.

<u>वाचा</u> :१) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/पीसीआय-मान्यता/२०२३-२४/६३९, दि.२०.०७.२०२३.
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/पीसीआय-मान्यता/२०२३-२४/६५८, दि.२५.०७.२०२३.
३) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/पीसीआय-मान्यता/२०२३-२४/६६७, दि.२८.०७.२०२३.

**प्रस्तावना :** फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राज्यात पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था, तसेच विद्यमान संस्थेत व विद्यापीठ विभागात नवीन अभ्यासक्रम व सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, संस्थेच्या नावात बदल करणे इ. साठी कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र संस्था सुरु करण्यास शासन मान्यता देण्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण यांनी संदर्भाधिन पत्रांन्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. सदर बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार Annexure A ते D मधील नमूद संस्थांना प्रचलित अटी व शर्तीच्या अधीन राहून कायम विनाअनुदानित तत्वावार शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अर्ज/ प्रस्ताव | सहपत्र |
|---|---|---|
| ०१ | नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. | Annexure - A |
| ०२ | विद्यमान डी.फार्मसी संस्थेत बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरू करणे, बी.फार्मसी संस्थेत सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. | Annexure - B |
| ०३ | विद्यापीठ विभागात नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. | Annexure - C |
| ०४ | विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थेच्या नावात बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. | Annexure - D |

**अटी व शर्ती:-**

१) सदर मान्यता ही कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) उपरोक्त Annexure - C मध्ये नमूद विद्यापीठ विभागांमध्ये सुरु करावयाच्या औषधनिमाणशास्त्र अभ्यासक्रमांबाबतच्या प्रशासकीय, शैक्षणिक व वित्तीय दायित्वाची जबाबदारी संबंधित विद्यापीठाची राहील.

३) प्रस्तुत बाबतीत फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

४) सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता सोबतच्या Annexure - A ते D मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

५) शासनाने विहित केलेल्या तसेच फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया ,नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

६) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

७) सदर पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

८) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

९) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

११) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य व संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये या शासन मान्यतेनुसार अभ्यासक्रमाचा समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण व संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी आवश्यक ते आदेश पुढील १० दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०७२८१६३५१०४२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( नि.ज्यो.घिरटकर )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३) सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४) सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
६) संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
७) फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया,कम्बाइन्ड कौन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान इ-गालिब मार्ग, नवी दिल्ली-११० ००२.
८) सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षणविभाग), नवी दिल्ली.
९) निवड नस्ती/तांशि-४

Annexure B

Higher and Technical Education Department Government Resolution No.Manyata-2023/C.R.57/TE-4, Dated-31st July, 2023.

List of New Course, Increase in intake in existing Unaided Pharmacy institute, Approved by PCI for A.Y. 2022-23

| Sr. No. | DTE CODE | PCI CODE | INSTITUTE NAME | STATUS | PROGRAMME | LEVEL OF COURSE | MAIN COURSE NAME | COURSE NAME | UNIVERSITY NAME | APPROVED INTAKE A.Y. 2022-23 | INTAKE APPROVED BY PCI A.Y.2023-24 | VARIATION |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 18 | 6355 | 143 | Shri Balasaheb Mane Shikshan Prasarak Mandal, Ambap's Ashokrao Mane College of Pharmacy, Peth Vadgaon, Tal.Hatkanagale, Dist.Kolhapur - 416113 | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmacognosy | Shivaji University, Kolhapur | 0 | 15 | 15 |
| 19 | 6360 | 879 | Shree Chanakya Education Society's Indira College of Pharmacy, Niramay, 89/2A, New Pune-Mumbai Highway, Tathawade, Pune- 411 033 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Savitribai Phule Pune University, Pune | 60 | 100 | 40 |
| 20 | 6360 | 879 | Shree Chanakya Education Society's Indira College of Pharmacy, Niramay, 89/2A, New Pune-Mumbai Highway, Tathawade, Pune- 411 034 | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmacology | Savitribai Phule Pune University, Pune | 9 | 15 | 6 |
| 21 | 6516 | 1146 | Krishna Charitable Trust's Krishna College of Pharmacy, Malkapur, Tal.Karad, Dist.Satara - 415539 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 60 | 100 | 40 |
| 22 | 6927 | 3517 | SSP Shikshan Sanstha's Siddhi College of Pharmacy, 1157-1160, Navale Vasti, Chikhali, Akurdi Road, Pune - 412 114 | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 60 | 100 | 40 |
| 23 | 6936 | 3618 | Krishna Foundations Jayawant Institute of Pharmacy Vathar, Gat No. 40,41, Pune Banglore Highway, Tal. Karad, Dist, Satara 415539 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 60 | 100 | 40 |
| 24 | 6954 | 3394 | Shri Ganpati Education and Research Institute's Shri Ganpati Institute of Pharmaceutical Sciences and Research, Tembhurni, Post Akole, Tal Madha, Dist Solapur - 413211 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Dr. Babasaheb Ambedkar Technological University,Lonere | 60 | 100 | 40 |
| 25 | 5005 | 1404 | MVP Samaj's College of Pharmacy, MVP Campus, Gangapur Road, Nashik - 422 002 | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmacology | Savitribai Phule Pune University, Pune | 4 | 9 | 5 |
| 26 | 5005 | 1404 | MVP Samaj's College of Pharmacy, MVP Campus, Gangapur Road, Nashik - 422 002 | Un-Aided | PHARMACY | POST GRADUATE | Master of Pharmacy | Pharmacognosy | Savitribai Phule Pune University, Pune | 4 | 9 | 5 |

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १०/एनजीपी/मान्यता/डी. फार्मसी/२०२१/ ८९५ दिनांक : 13 OCT 2021

प्रति,
प्राचार्य,
एन.डी.एम.व्ही.पी. समाजचे,
कॉलेज ऑफ फार्मसी,
एमव्हीपी कॅम्पस, गंगापूर रोड,
शिवाजी नगर, नाशिक-४२२००२.

[5005]

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या अनुदानित संस्थेत नवीन विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.**

**संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०२१/(प्र.क्र.९२/२१)तांशि-५, दिनांक : १.९.२०२१.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मानयतेस अनुसरुन उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून आपल्या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या अनुदानित संस्थेत नवीन विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून शासन मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | अभ्यासक्रमाचा स्तर | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | डीप्लोमा फार्मसी | पदविका | ६० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या अनुदानित संस्थेमध्ये कायम विनाअनुदान तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याच्या अनुषंगाने मुदतठेव म्हणून **रु. ३.०० लाख, खाते क्र. ४०४२०५७३७२५, दिनांक : ६.९.२०२१ अन्वये, भारतीय स्टेट बँक, शाखा गंगापूर रोड (नाशिक),** येथे संस्था व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी ठेवलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीसह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून आपल्या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या अनुदानित संस्थेत

कायम विनाअनुदान तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेस सुरु करण्यास, विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ तसेच शासनाच्या मानकांप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.
२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमांक व पासवर्डव्दारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था व संचालनालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करतील.
३. संस्थेने प्रवेशासाठी औषधनिर्माणशास्त्र पदविका [D. Pharmacy] अभ्यासक्रमाची तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.
४. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास/ फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया यांना राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने माहितीसाठी सादर.

प्रत: माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेशित :

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, **नाशिक**.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, **औरंगाबाद**.
४. कार्यासन क्रमांक ३, (आयटी सेल), मुख्य कार्यालय, मुंबई.
५. निवड नस्ती.

16.10.2021

College of Pharmacy, Nashik-2
File No. - 118/2021-2022
Inward No. 16 OCT 2021
Date:-